# ग्रीक शोकांतिका : अंक तीन

चन्द्रशेखर पुरन्दरे




देशाची दिवाळखोरी पुढे ढकलावी म्हणून ५ जुलैला ग्रीसमध्ये सार्वमत घेण्यात आले. ग्रीसचे प्रमुख तीन सावकार आहेत. युरोपियन सेंट्रल बँक (ECB), आंतरराष्ट्रीय नाणेनिधी (IMF) आणि युरोपियन युनियन (EU). ग्रीसला कफल्लकतेच्या कड्यावरून मागे घेण्यासाठी या तिघांनी मिळून अधिक पैसा पुरवण्याचा प्रस्ताव मांडला. त्यानुसार ग्रीक सरकारला जनतेवर अनेक जुलमी अटी त्वरित लादाव्या लागतील हे स्पष्ट होते. या जुलमी अटींवर कर्ज स्वीकारायचे का या प्रश्नावर सार्वमत होते. त्यात ६१% लोकांनी 'नको' असे मत नोंदवले. सरकारचीही अधिकृत भूमिका तीच होती.

प्राचीन काळापासून ग्रीक शोकांतिका सुष्ट व दुष्ट प्रवृत्तीतील संघर्ष दर्शवत असे. शेवटी नियतीतर्फे दुष्ट प्रवृत्तीचा विजय, म्हणून शोकांतिका. मात्र सध्याचे नाटक असंगताचे नाटक (absurd theatre) दिसते. उदाहरणार्थ, ज्या प्रस्तावावर ५ जुलैला सार्वमत घेतले गेले, तो प्रस्तावच ३० जूनला संपुष्टात आला होता! मग सार्वमत घेतले कशाला, त्यातील मतदानाला काय अर्थ होता हे ना ग्रीक मतदारांना कळले, ना वित्तसंस्थांना, ना युरोपला, ना उर्वरित जगाला. हे असंगताचे नाटक(absurd theatre) एवढ्यावर थांबले नाही. ज्या सरकारने मूळ प्रस्ताव हा या संस्थांचा 'आर्थिक आतंकवाद' आहे, ग्रीसला ब्लॅकमेल करण्याचा प्रयत्न आहे, एकविसाव्या शतकातील वसाहतवाद आहे इत्यादी आरोप केले होते, त्याच सरकारने त्या प्रस्तावापेक्षा अधिक जाचक अटी १६ जुलैला मान्य केल्या व पैशाची याचना केली. त्याबरोबर शोकांतिकेचा तिसरा अंक सुरू झाला.

**घटनाक्रम**

गोष्टी या थराला कशा व केव्हा पोचल्या याचा आधी आढावा घेऊ. युरोपियन युनियन ही युरोपातील २८ देशांची संघटना आहे. त्यातील १९ देशांत युरो हे एकच चलन आहे. (एक युरो म्हणजे ६८ रुपये). दुसऱ्या महायुद्धानंतर क्षीण झालेला युरोप, रशियाच्या प्रभुत्ववादाला आळा यासाठी युरोपातील लोकशाही-भांडवलशाही देशांना अशा एका चलनामुळे कल्याणकारी राज्याचा प्रकल्प पुढे नेता येईल व एकसंध बाजारपेठेत व्यवहार सुलभ होतील हा दावा व अपेक्षा होती. पण युरोपअंतर्गत व्यवहार सबळ करणे म्हणजे जे आधीच संपन्न देश आहेत ते गरीब देशांचे शोषण अधिकृतपणे करतील हे उघड होते व तसेच झाले.

ग्रीस १ जानेवारी १९८१ ला युनियनमध्ये दाखल झाला आणि २००१ ला त्याने युरो हे चलन स्वीकारले. लगेचच प्रामुख्याने फ्रेंच व जर्मन बँकांनी ही उभरती बाजारपेठ आहे हे ओळखून पैशाचा प्रचंड ओघ ग्रीसकडे वळवला. शोकांतिकेचा पहिला अंक या स्वस्तातल्या मुबलक पैशाबरोबर सुरू झाला. तो २०१० पर्यंत चालू राहिला. मग दुसरा व आता तिसरा अंक.

पहिल्या ७-८ वर्षांत ग्रीसची भरभराट झाली. उद्योगधंद्यांत,

मूलभूत सुविधात गुंतवणूक झाली. पर्यटन व्यवसाय, सेवाक्षेत्र यांचीही वाढ झाली. दरडोई उत्पन्न तिपटीने वाढले. पण त्याचबरोबर उधळमाधळ सुरू झाली. भ्रष्टाचार प्रचंड वाढला. २००४ चे ऑलिंपिक भरवणे, लष्करावर अतोनात खर्च करणे ही दोन ठळक उदाहरणे. २००४ ते २००८ मध्ये मिळकत ४०% ने वाढली तर खर्च ८३%ने. स्वस्तातल्या उसन्या पैशावरचा हा खेळ दीर्घकाळ चालणे शक्य नव्हते. मग आणखी कर्ज मिळावे म्हणून सरकारने हिशेबात अफरातफर चालू केली. दरम्यान अनेक सरकारे आली व गेली. प्रत्येक नव्या सरकारला आधीच्या सरकारने खोटा ताळेबंद केला आहे हे कळूनही राष्ट्रीय तूट लपवण्यासाठी त्यांनी तोच उद्योग चालू ठेवला. ग्रीसच्या सरकारी आकडेवारीवरचा वित्तसंस्थांचा विश्वास उडाला. आपल्याकडच्या सत्यम प्रकरणासारखा हा घोटाळा कधीतरी उघडकीला येणार होता. २००५ पासून जागतिक प्रमाण संस्था (फिच, स्टँडर्ड व पुअर आणि मूडी) ग्रीसची पत घसरत असल्याचे सतत जाहीर करू लागल्या. त्यामुळे आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांकडून नवीन कर्जे मिळवणे तेवढे अवघड होत गेले.

२००७-०८ मध्ये अमेरिकेत सुरू झालेली मंदीची लाट जगभर पसरली आणि खोट्या हिशोबाचे ग्रीक पितळ उघडे पडले. २०१० साली ग्रीस दिवाळखोरीच्या मार्गे वेगाने जात आहे हे लक्षात आल्यावर वित्तसंस्थांनी हस्तक्षेप केला. फ्रेंच व जर्मन बँकांना त्यांचा पैसा ग्रीसमधून बाहेर काढणे हा प्रमुख उद्देश होता. ग्रीस वाचला तर पैसा परत मिळण्याची शक्यता तरी होती म्हणून 'ग्रीसला वाचवणे' हा दिखावा. या संदर्भात वित्तसंस्थांच्या शिफारशींनुसार 'सुधारणा' केल्या तर ग्रीस आधीचे कर्ज तरी परत देऊ शकेल का याचा अभ्यास IMF ने केला. (तो अभ्यासही संशयास्पद गृहीतांवर आधारित होता हे नंतर उघड झाले.) कर्जबाजारी ग्रीसचे कोणतेही कर्ज तेव्हा माफ करण्यात आले नाही व जास्तीचे कर्ज 'सुधारणा' करण्याच्या अटींवर देण्यात आले.


**कर्जाच्या अटी**

सर्व सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार गोठवावेत. बोनसच्या रकमा १०% ने कमी कराव्यात. ओव्हरटाईम कमी करावा. पुढच्या कपातीत निवृत्तीवेतन गोठवावे. विक्रीकर १९% वरून २१% करावा. पेट्रोलियम, इतर इंधन, अल्कोहोल, सिगारेटी, चैनीच्या वस्तूंवरील कर वाढवावेत. सार्वजनिक क्षेत्रातील वेतनात कपात करावी. स्त्रियांसाठी निवृत्तीचे वय ६० वरून ६५ वर नेण्यात यावे. या 'सुधारणा' २०११ ला अंमलात आल्या, काही नवीन करही अस्तित्वात आले पण ग्रीसची पत घसरतच राहिली. महागाई, बेरोजगारी वाढली, अर्थव्यवस्था आक्रसू लागली. मग लोकांनी रस्त्यावर येऊन निषेध, हिंसक निदर्शने, जाळपोळी सुरू केल्या. हीच परिस्थिती आजही आली आहे.

**२०१० चे IMF चे कर्ज**

२०१० ला IMF ने ग्रीसला सुमारे २१ अब्ज युरोचे कर्ज दिले. (एक अब्ज म्हणजे एकवर नऊ शून्ये). २०१०च्या शेवटापर्यंत हे लक्षात आले, की ग्रीसला हे कर्ज झेपणारे नाही. मग काही कर्ज माफ करण्याच्या वाटाघाटी सुरू झाल्या. ग्रीसने काही राष्ट्रीय मालमत्ता विकावी अशी सूचना पुढे आली. ते घडले नाही व मंदी चालूच राहिली. २०१२ ला दुसरी दिवाळखोरी टाळण्याची योजना पुढे आली. त्यानुसार IMF ने साडेअकरा अब्ज युरो व इतर युरोपने १३१ अब्ज युरो दिले. यावेळच्या प्रमुख अटीही आधीच्या सारख्याच होत्या. करवसुली सक्षम व्हावी, सरकारी खर्चावर नियंत्रण असावे, उद्योगांना प्रोत्साहन द्यावे, वगैरे. आधीची कर्जफेड याच मुद्द्यांवर ठप्प झाली होती, मग ही कर्जफेड यशस्वी होईल हा विश्वास बाळगणे धाडसाचे होते. दरम्यान कर्ज घेण्याच्या किंमतीत युरोपमध्ये घट झाली व ग्रीसवरील कर्जफेडीचे दडपण जरा कमी झाले. मग बँकांनी त्यांच्या आर्थिक क्लृप्त्या वापरायला सुरूवात केली. ग्रीसचे कर्ज तारण म्हणून वापरायला आरंभ झाला. त्यायोगे विशेषत: फ्रेंच व जर्मन बँकांनी आपला पैसा बाहेर काढून घेतला. यात अनेक प्रख्यात वित्तसंस्थांनी हात धुवून घेतला. एका वरिष्ठ पदाधिकाऱ्याचे या कालावधीवरचे नंतरचे उद्गार असे – 'आम्हाला फार चांगली संधी आली कारण आम्ही काय करत आहोत हे ग्रीकांना कळतच नव्हते!' डबघाईला येण्याची वेळ पूर्णत: ग्रीसच्या स्वत:च्या बेशिस्त वर्तणुकीने आली हा समज सार्वत्रिकदृष्ट्या तेव्हापासून दृढ होऊ लागला. वस्तुत: वित्तसंस्थांच्या कठोर अटींमुळे ग्रीसची अर्थव्यवस्था चार पंचमांश झाली आणि बेरोजगारी वाढली.

**२०१४-१५ :** २०१४ च्या शेवटापर्यंत ग्रीसची परिस्थिती जरा सुधारत आहे असे दिसू लागले. पण दरम्यान लोकांचा सरकारवरचा विश्वास डळमळीत झाला होता. बेरोजगारी अनेक वर्षे २५% च्या आसपास होती ती तरुणांच्यात तर ५०% ला



पोचली. बेघरांची संख्या वाढू लागली, कित्येक छोटे व्यवसाय (लाखात) बंद पडले. हा सगळा संपन्न युरोपचा वसाहतवाद आहे हा ग्रह होऊ लागला. त्यामुळे २०१५ ला डाव्या आघाडीला बहुमत मिळून त्यांचे सरकार निवडून आले. या आघाडीतील प्रमुख पक्ष सीरिझा (Syriza). आज ग्रीसचे परकीय कर्ज राष्ट्रीय उत्पन्नाच्या पावणेदोन पट - ३१७ अब्ज युरो आहे.

हे जपाननंतर जगातले एका देशाचे सर्वात मोठे कर्ज आहे. सीरिझाच्या प्रचारानुसार हे कर्ज वित्तसंस्थांच्या धोरणांमुळे लादले गेले. सत्तेवर आल्यानंतर म्हणजे यावर्षीच्या जानेवारीपासून जूनपर्यंत त्यांची हीच भूमिका राहिली. हे सहा महिने एकीकडे ग्रीस व दुसरीकडे IMF, ECB व युरोपियन युनियन यांच्यात वाटाघाटी चालू राहिल्या. सध्याच्या संकटात ३० जून ही तारीख महत्त्वाची होती. तेव्हा आधीच्या कर्जाची मुदत संपली व ग्रीसने IMF ला १.६ अब्ज युरो देणे अपेक्षित होते. युरोपियन बँक व IMF यांनी यातील एक पैसाही कमी होणार नाही हे प्रत्येक चर्चेत बजावले. त्यात तेव्हाच्या ग्रीक अर्थमंत्र्याने पुस्तकी डावा आदर्शवाद पाजळत मदत करू इच्छिणाऱ्या इटली व फ्रान्स या देशांनाही दुरावले. जर्मनी पहिल्यापासून कडक अटींचा पुरस्कर्ता होता.

कर्जाच्या अटीतील तीन अटी सीरिझाला आक्षेपार्ह होत्या. एकतर सरकारी खर्चात करायला लागणाऱ्या कपातीचे प्रमाण त्यांना मंजूर नव्हते. एवढी कपात नको असे त्यांचे म्हणणे. अधिक उत्पन्न मिळवण्यासाठीच्या काही योजनाही अमान्य होत्या. त्याचा परिणाम निवडणुकीआधीच, जेव्हा सीरिझा सत्तेवर येणार हे स्पष्ट झाले, तेव्हाच दिसू लागला होता. म्हणजे, आपल्याला मान्य नसणारे कर देणेच लोकांनी थांबवले. तिसरी मागणी म्हणजे संचित कर्जातील काही कर्ज माफ करावे. वित्तसंस्थांना हे बदल अमान्य होते. त्यांनी वरवरची थोडीफार सूट द्यायची तयारी दाखवली पण त्यांच्या प्रस्तावाचा गाभा तोच राहिला. वाटाघाटींचे गुऱ्हाळ सहा महिने चालू असताना युरोपवर दबाव आणण्यासाठी ग्रीक पंतप्रधानाने रशियाकडे धाव घेतली. 'एकादशीकडे शिवरात्र' असा हा प्रकार होता. रशियाच स्वत:च्या आर्थिक अडचणीत असल्याने ग्रीसला त्या प्रमाणात पैसा देणे शक्य नव्हते.

जून अखेरीस दोन्ही बाजू आपल्या भूमिकेवर अडून बसल्याने ग्रीस युरो झोनमधून (म्हणजे युरो हे चलन असलेल्या गटातून) बाहेर पडेल, स्वत:चे चलन सुरू करेल किंवा युरोपच ग्रीसला पाच वर्षांसाठी बहिष्कृत करेल अशा अनेक शक्यतांवर चर्चा झाल्या. पण ग्रीस बाहेर पडला तर आजवर दिलेल्या कर्जाची वसुली अशक्यप्राय झाली असती. त्यामुळे ग्रीस बाहेर पडण्याच्या तोट्यापेक्षा ग्रीसला पोसण्याचा तोटा परवडण्यासारखा होता. शिवाय ग्रीक लोकांनाही युरोपमधून व युरोमधून बाहेर जायचे नव्हते. लक्षणीय बाब म्हणजे 'आम्ही तिसरे जग नाही' हा त्यांचा दावा आहे!

ग्रीसने मुख्य प्रवाही युरोपशी फारकत घेणे हा काही तज्ज्ञांच्या मते सूज्ञ निर्णय ठरला असता. कारण युरो हे चलन वर-खाली करणे (म्हणजे त्याचे आंतरराष्ट्रीय अर्थकारणातील मूल्य खालीवर करणे) कोणत्याच एका देशाला शक्य नाही. ग्रीसने स्वत:चे चलन पुनरुज्जीवित केले तर त्याचे अवमूल्यन ग्रीसला शक्य झाले असते. अशा 'स्वस्त' चलनाने ग्रीसची (जी काही आहे ती) निर्यात वाढली असती, पर्यटनालाही उत्तेजन मिळाले असते. १९८० च्या दशकात फिनलंड हा आता युरो स्वीकारलेला दुसरा देश अशाच परिस्थितीत होता व तेव्हाच्या स्वतंत्र चलनाचे अवमूल्यन करून मंदीबाहेर आला. पण हा पर्याय दोन्ही पक्षांना स्वीकारार्ह नसल्याने प्रत्यक्षात आला नाही.

**सावकारांची भूमिका**

आता वित्तसंस्थांना ग्रीक सरकारची भूमिका का नामंजूर होती हे पाहू. एकतर इतर युरोपियन देशही ग्रीसइतक्या गंभीर नाही पण घसरगुंडीला लागले होते. ते म्हणजे इटली, पोर्तुगाल, स्पेन आणि आयर्लंड. तेव्हा त्यांना कर्जे देताना अशाच अटी लादण्यात आल्या होत्या. त्यांच्या जनतेलाही त्या मान्य नव्हत्या पण त्यांनी त्या मानल्या व ते देश त्या बिकट कालातून (वित्तसंस्थांच्या मते) बाहेर आले. वस्तुत: तरुणांची बेरोजगारी या औषधानंतर तेवढीच राहिली, पोर्तुगालची अर्थव्यवस्था ६% ने आक्रसली. पण या वित्तसंस्थांचे प्रतिपादन असे, की ग्रीसला जर सवलती दिल्या तर या देशांनाही त्या द्यायला लागतील. त्याचा 'विपरीत' परिणाम म्हणजे, डावा पक्ष सत्तेवर आला तर अशा सवलती मिळू शकतात असा निष्कर्ष या देशांच्या जनतेने काढला, तर तेथेही डाव्या आघाड्या सत्तेवर येतील. भांडवलशाही हा पाया असणाऱ्या युरोपियन युनियनला ही शक्यता टाळायची आहे.

दुसरे म्हणजे, ग्रीसच्या अर्थव्यवस्थेच्या मानाने त्या देशाचे कर्ज मोठे आहे. (वर म्हटल्याप्रमाणे पावणेदोन पट). पण आकड्यात पाहता कर्जाची रक्कम युरोपच्या अर्थव्यवस्थेच्या प्रमाणात कमी आहे, म्हणजे युरोपला परवडणारी आहे. ही गोष्ट इटली किंवा स्पेनची नाही.

तिसरे म्हणजे, ३० जूनला ग्रीसने IMF ला पैसे परत केले नाहीत आणि ते IMF व युरोपला मान्य झाले, तर तो युरोपसाठी अनिष्ट पायंडा होईल.

या प्रमुख कारणांनी वित्तसंस्थांना ग्रीक सरकारचे प्रतिपादन नामंजूर होते.

**जुलैमधला ग्रीस**

सामान्य माणसाच्या जीवनातील दोन-तीन उदाहरणे पाहण्यासारखी आहेत.

ग्रीक बँकांना पैसा मिळतो तो युरोपियन बँकेकडून. हा पैसा

थांबला की या बँका थांबल्या. ते जून अखेरीस झाले. त्याआधी २००९ पासूनच लोकांचा देशातील बँकांवरील विश्वास उडायला सुरूवात झाली होती आणि मोठ्या प्रमाणावर त्यांनी बँकांतून पैसे काढले व परदेशी रवाना केले. २००९ मध्ये ग्रीक बँकांमध्ये २३० अब्ज युरो ठेवी होत्या त्या या जूनपर्यंत १२६ अब्ज युरोपर्यंत आल्या. जूनमध्ये तर दररोज एक अब्ज युरो काढले गेले. पैशाचे हे देशाबाहेर जाणे थांबवण्यासाठी सरकारने हे व्यवहारच स्थगित केले. त्याबरोबर पैशाची इलेक्ट्रॉनिक ट्रान्सफर, म्हणजे इंटरनेटवरून देशाबाहेर पैसा हलवणे थांबवले. मग २९ जूनला बँकाच बंद केल्या. काही शाखा फक्त निवृत्त ज्येष्ठ नागरिकांना आठवड्याचे निवृत्ती वेतन देण्यासाठी उघड्या राहिला. अशा शाखांच्या बाहेर या वृद्ध लोकांची झुंबड होत असे. गर्दीला शिस्त लावण्यासाठी शाखा प्रत्येक माणसाला टोकन देऊ लागली व टोकनवरील नंबराप्रमाणे रांग लागली. एका वृद्धेने तिच्या टोकनचा नंबर टीव्हीवर दाखवला. तो होता १०७. 'हा नंबर येईपर्यंत मी जिवंत असणार का?' असे तिने विचारले. सामान्य माणसाची, त्यातही दुबळ्या स्तराची, अशी अवहेलना होत होती.

उद्योजक निराळ्याच पेचात सापडले. अनेक उद्योगांचा माल परदेशातून ग्रीसमध्ये आयात होतो. एका खाद्यपदार्थांच्या उद्योगाने १५ टन मिरी आफ्रिकेतून आयात केली. ते जहाज एका ग्रीक बंदरात अडकून पडले. कारण पुरवठा करणाऱ्याला पैसे बँकेमार्फत पाठवता येत नव्हते. मिरी खराब झाली. पण जेव्हा बँका उघडतील तेव्हा ती आयात करणाऱ्याला ते पैसे त्या व्यापाऱ्याला द्यावे लागणार. ज्यांचा व्यापार युरोपशी होता, ते लोक बॅगा भरून नोटा घेऊन जाऊ लागले कारण युरोपअंतर्गत तसे करता येते. मग ते रोख पैसा देऊन माल खरेदी करू लागले. हिऱ्याच्या जडजवाहिरांचे एकाचे दुकान आहे. त्याच्याकडे १० लाख युरोचा एक दागिना खरेदी करू इच्छिणारा ग्राहक आला. व्यापाऱ्याने त्याला नकार दिला. त्याचे म्हणणे असे की, हे दहा लाख युरो मी बँकेत ठेवणार. उद्या बँकच बुडाली तर हे पैसेही बुडणार. त्यापेक्षा मी विक्री न करता बसून राहीन. दैनंदिन व्यवहार कसे थांबले त्याची ही उदाहरणे.

**वाटाघाटी**

दोन पक्षात वाटाघाटी या पार्श्वभूमीवर सुरू झाल्या. त्यात एक-दोन गोष्टी उघड झाल्या. एक म्हणजे प्रमुख सावकार जर्मनी - त्याच्या प्रतिनिधींना ग्रीक लोकांच्या या रोजच्या हालअपेष्टा महितीच नव्हत्या. त्यात भर म्हणजे त्यांचे पूर्वग्रह - जर्मन शिस्तीचे, नियमांचे पालन करणारे, भरपूर काम करणारे तर ग्रीक आळशी, बेशिस्त आणि भ्रष्टाचारी. अशा कोणत्याही वाटाघाटीत व्यापाराच्या - चर्चेच्या निखळ निकषांपेक्षा दोन बाजूंच्या व्यक्तींचे परस्पर वर्तन, त्यांचे एकमेकांविषयीचे मत महत्त्वाचे असते. त्यात ग्रीसचा




त्यावेळचा अर्थमंत्री आणि पंतप्रधान यांनी पुस्तकी डाव्या आदर्शवादाने दुसऱ्या बाजूच्या प्रतिनिधींचे बौद्धिक घेण्याचा प्रयत्न केला. टाळ्या मिळवणारी विधाने प्रचारसभांसाठी असतात. आर्थिक चर्चेसाठी निश्चित व मुद्देसूद प्रस्ताव लागतो. तो ग्रीसतर्फे आला नाही. त्याऐवजी 'तुम्ही आमची लूट करत आहात, आम्हाला ओलीस ठेवत आहात'अशी विधाने करण्यात आली. शेवटी IMF च्या अध्यक्षांनी 'ज्या खोलीत प्रौढ असतील, तेथे चर्चा होऊ शकेल' असे म्हटले. आधी कर्जफेडीच्या कर्तृत्वाने देशाची विश्वासार्हता खालावली होतीच ती या वाटाघाटींमध्ये रसातळाला गेली. संवाद बंद पडण्याचीच वेळ आली. हा चक्रव्यूह ओळखून ग्रीक पंतप्रधानाने अचानक सार्वमताचा निर्णय जाहीर केला. 'लोकांना ठरवू दे'. पण लोक काय ठरवणार हाच प्रश्न होता. सार्वमत कशासाठी हेच अनिश्चित होते. पण एकदा तो निर्णय जाहीर झाल्यावर दोन्ही बाजू तंबूत परतल्या.

सार्वमत कशासाठी याचा अर्थ प्रत्येकाने निराळाच लावला. बहुसंख्य ग्रीक जनता गेल्या काही वर्षांच्या टंचाईने गांजली आहे. ही परिस्थिती लादणारा युरोप, विशेषत: जर्मनी यांचा निषेध म्हणून नकारात्मक मतदान झाले. कर्ज परतफेड नको असा अर्थ युरोपने लावला.

त्यानंतर ताबडतोब सरकारने वित्तसंस्थांपुढे लोटांगण घातले. ३० जूनच्या आधीच्या प्रस्तावापेक्षाही जाचक अटी मान्य केल्या. त्यामुळे सत्ताधारी पक्षातच आता फूट पडली आहे.

आधी नव्या कर्जाच्या अटी बघू.

राष्ट्रीय उत्पन्न एक टक्केने वाढेल इतपत विक्रीकर वाढवावा. (तो २० जुलैपासून विक्रेत्यांनी वाढवला व वस्तू महाग झाल्या.) प्रकिया केलेल्या खाद्यपदार्थांवर, उपाहारगृहात हा कर २३% असावा. लष्करावरील खर्च २०१५ मध्ये १० कोटी युरोने व २०१६ साली २० कोटी युरोने कमी करावा. करवसुली सक्षम करावी. प्रादेशिक विमानतळ, बंदरे यांचे खासगीकरण करावे. ५०

अब्ज युरो जमा होतील इतपत राष्ट्रीय मालमत्ता विकावी. मोठ्या खासगी गाड्या, बोटी, पोहण्याचे तलाव यावर चैनीचा कर बसवावा. लहान उद्योगांवरील कर २०% वरून २९% वर न्यावा; इत्यादी. आधीचे निर्बंध - निवृत्तीचे वय वाढवणे, निवृत्तीवेतन कमी करणे हे चालूच राहणार.

विशेष म्हणजे एकीकडे उद्योग वाढवावा म्हणजे अर्थव्यवस्थेला मदत होईल असा इशारा होता. पण कर वाढवल्याने अनेक उद्योजक उद्योगच बंद करण्याच्या विचारात आहेत.

या अटी मान्य केल्यावर पुढच्या कर्जाच्या वाटाघाटी सुरू होणार. ते ८६ अब्ज युरोचे कर्ज इतके तुटपुंजे आहे की त्याने अर्थव्यवस्था उभी राहणेही अशक्य आहे; सुधारणे सोडाच. १९ जुलैच्या अंदाजानुसार ग्रीक अर्थव्यवस्थेत पुढच्या वर्षात ४% तरी घट होईल.

**पुढचे राजकीय काव्य**

आधी वित्तसंस्थांना वसाहतवादी ठरवून नंतर त्यांच्या सर्व अटी मान्य करण्याने सरकार अडचणीत आहे. या नव्या 'सुधारणांचा' भार अभिजनांवर दिला जाईल असा पंतप्रधानांचा बचाव आहे. अभिजनांनीच देश लुटला याची किंमत त्यांना द्यायला लागेल जाहीर तरी केले आहे. पण या भूमिकेवर किती लोकांचा विश्वास बसेल ते अनिश्चित आहे. युरोप व IMF चा एक हेतू हे सरकार पाडण्याचा असल्याचा संशय आहे. तसे झाल्यास सप्टेंबरमध्ये नव्या निवडणुका होतील. त्या टाळण्यासाठी सध्याच्या विरोधी पक्षांबरोबर (जे या अटी स्वीकारायला कबूल होते) संयुक्त सरकार स्थापन करणे हा एक पर्याय आहे.

ग्रीसच्या प्रकरणाचा एक परिणाम म्हणजे युरोपियन युनियनचे सभासद पण ज्यांनी आजवर युरो हे चलन स्वीकारलेले नाही ते देश सावध झाले आहेत. ज्यांनी युरो स्वीकारला आहे व जे गरीब आहेत त्यांच्याकडून 'ग्रीसचे ओझे आम्ही का स्वीकारायचे' अशी पृच्छा होत आहे.

ब्रिटन, डेन्मार्क आधीपासूनच युनियनमध्ये पण युरोबाहेर आहेत. त्यांनी स्वत:ची चलने चालू ठेवली आहेत. उरलेल्या देशात पोलंडची अर्थव्यवस्था बळकट आहे. त्यांनी पुढच्या पाच वर्षांत तरी आम्ही युरो स्वीकारणार नाही असे म्हटले आहे. रोमानिया, चेक रिपब्लिक, हंगेरी हेही युरो स्वीकारायला उत्सुक नाहीत.

युरोची उपयुक्तता व देशाचे सार्वभौमत्व या प्रश्नांवर आणखी काही काळ खल चालू राहील.

जानेवारीपासूनच्या सहा महिने चाललेल्या वाटाघाटीत IMF, युरोपियन बँक व युरोपियन युनियनमधील देश यांच्यातील मतभेदही चव्हाट्यावर आले. बँकेचे १५० अब्ज युरो आज ग्रीसमध्ये अडकलेले आहेत. ही रक्कम ग्रीसच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या ८३% आहे. सायप्रस, आयर्लंड या याआधी अशाच आर्थिक अडचणीत असणाऱ्या देशांचे कर्ज या प्रमाणात नव्हते. विशेष म्हणजे IMF ची निर्मिती विकसनशील देशांना मदत करण्यासाठी झाली पण आज त्यांचा दोन-तृतीयांश पैसा ग्रीस, आयर्लंड व पोर्तुगालमध्ये म्हणजे युरोपमध्ये अडकला आहे. त्यांचा इतर युरोपशी असणारा तणाव स्पष्ट होऊ लागला आहे. त्यांनी संदिग्धपणे तरी युरोपातील श्रीमंत देशांना सांगितले आहे की ग्रीसला थोडीफार तरी कर्जमाफी दिल्याखेरीज ग्रीस या दुष्टचक्रातून कधीच बाहेर येणार नाही. अर्थव्यवस्था कितीही वेगाने वाढली आणि सगळ्या 'सुधारणा' केला तरी कर्जाचा डोंगर हलणार नाही. त्यामुळे कर्जमाफी तरी करावी किंवा कर्जाच्या परतफेडीची मुदत इतकी वाढवावी की त्याचे दडपण ग्रीसवर येणार नाही. हा पर्याय इतर देशांना मान्य होण्यासारखा आहे. कर्जमाफीचा पर्याय तद्देशीय मतदारांना आवडणार नाही पण ग्रीस आता नाही तरी पुढच्या पन्नास वर्षांत कर्ज परत करणार आहे हे कदाचित मान्य होऊ शकेल. ग्रीस सरकारलाही आपल्या जनतेला हे पटवणे सोपे आहे की आता कर्जाच्या अटी सुलभ आहेत. युरोपमधील अंतर्गत मतभेदही दिसून आले. इटली व फ्रान्स ग्रीसला सहानुभूत होते. जर्मनी कडक धोरण अवलंबावे या मताचा. पण जर्मनी सर्वात श्रीमंत असल्याने अटी कितीही जाचक दिसल्या तरी इतर देशांना त्या सैल करता आल्या नाहीत. एकूण 'एक युरोप' या संकल्पनेला तडे गेलेले दिसतात.

**निरीक्षणे**

लेखाच्या सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे ही शोकांतिका आहे. जर समाजातील दुबळा स्तर कोणत्याही धोरणाने अधिकच दुबळा होत असेल तर निर्विवादपणे ती सामाजिक शोकांतिका होते.

मग पुढचा प्रश्न अर्थातच याला जबाबदार कोण? भांडवलशाहीच्या पोथीबद्ध विरोधकांनुसार IMF व जागतिक बँक व त्यांच्या तालावर चालणारी भांडवलशाही राष्ट्रे ग्रीक संकटाला जबाबदार आहेत. म्हणजे ती दुष्ट प्रवृत्ती आणि ग्रीस सुष्ट प्रवृत्ती. पण ग्रीसचे सरकार या संकटाला यांच्याइतके नसले तरी पुरेसे जबाबदार दिसते. तिसरा जबाबदार घटक नागरिक. दुबळा स्तर सोडता वरच्या स्तराचा करचुकवेपणा, नोकरशाहीची लाचखोरी या परिस्थितीला जबाबदार आहेत आणि त्याविरुद्ध बहुसंख्य निष्क्रिय राहिले. वर म्हटल्याप्रमाणे निवडणुकीच्या आधी त्यांनीही कर चुकवायला सुरूवात केली.

साध्या भाषेत मांडणी करायची झाली तर मी कोणाकडून गरजेच्या नावाखाली पैसे उसने घेत असेल, तर

एक : मी या पैशाचा विनियोग ती गरज भागवण्यासाठीच केला पाहिजे.

दोन : विनियोगाचा प्रामाणिक हिशोब ठेवला पाहिजे.

*(पान २६ वर)*

*जगभर - ग्रीस, (पान २२ वरून)*

तीन : कर्ज घेताना व्याजाचा दर, कर्जाची मुदत इ.

अटी मान्य केल्या असतील तर त्यातून पळवाटा काढणे योग्य नाही.

वैयक्तिक पातळीवर बँक म्हणा, सावकार म्हणा कर्जवसुलीसाठी माझ्या घरावर, मालमत्तेवर टाच आणेल. त्या भीतीने का होईना मी शिस्तीत कर्जाची परतफेड करतो. ग्रीसने राष्ट्र म्हणून ही शिस्त पाळली नाही हे उघड आहे. करवसुली हे एक उदाहरण. चुकवलेल्या करांचा पैसा स्विस बँकेत जमा झाला. (आज ८० अब्ज युरो). भ्रष्टाचारात ग्रीस युरोपमधला पहिल्या क्रमांकाचा देश झाला. २०१० साली चुकवलेल्या करांचा अंदाज २० अब्ज युरो होता. २०१२ मध्ये वसूल व्हायला हवा त्याच्या जेमतेम निम्मा कर वसूल झाला. याच वर्षी काळा पैसा एकूण अर्थव्यवस्थेच्या एक चतुर्थांश होता.

दुर्दैवाने या व्यवस्थात्मक विकारांवर उपाय करण्याऐवजी युरोच्या मोहात परकीय वित्तसंस्थांचा देशाच्या कारभारात प्रवेश झाला. त्यांचे उपाय म्हणजे आग रामेश्वरी आणि बंब सोमेश्वरी असे सरसकट नाही तरी बऱ्याच प्रमाणात तसे राहिले. त्यामुळे अपराध समाजाच्या वरच्या स्तराने केला पण शिक्षा खालच्या स्तराच्या कपाळी आली.

रस्त्यावर येऊन हिंसक किंवा अहिंसक निषेध करण्यापलीकडे नागरिकांना लोकशाहीत मोकळीक नाही हेही स्पष्ट झाले, निर्णायक भूमिका दूरच. या निषेधातही होरपळ होते ती त्याहून खालच्या स्तराची.

दुर्धर विकार आणि अक्षम वैद्य असा हा संयोग आहे. इथे तर दोन अक्षम वैद्य एकत्र आलेले दिसतात. वरवर पाहता वित्तसंस्था दिसतात. ज्यांच्या इशाऱ्याने त्या चालतात ते अर्थतज्ज्ञ हे खरे गुन्हेगार आहेत. त्यांच्या पुस्तकी, अव्यावहारिक ज्ञानाने अनेक समाज गर्तेत गेले आहेत आणि जात आहेत.

दुसरा गुन्हेगार राजकारणी. तेही कोणत्याही आदर्शवादाच्या तुताऱ्या फुंकत असते तरी त्यांना समाजाच्या प्रश्नांचे आकलन असते का याचा संशय येतो. सामाजिक समस्यांच्या निराकरणाची क्षमता, हितसंबंध हे पुढचे मुद्दे. त्यांची विश्वासार्हता ग्रीसच्या सध्याच्या डाव्या नेतृत्वावरून कळते.

यांच्या संगनमताने हलाहल मात्र सामान्य माणसाला घ्यायला लागत आहे.

**भारताशी तुलना**

लेखावरून साधर्म्य स्थळे सहज लक्षात यावीत. भ्रष्टाचार, देशाबाहेर जाणारा पैसा, अतोनात लष्करी खर्च, खासगी क्षेत्रातील सरकारी संगनमताने होणारी पैशाची अफरातफर इत्यादी.

तळातल्या युरोपियनालाही आंतरराष्ट्रीय वित्तसंस्थांबाबत जाणीव दैनंदिन जीवनात होते ती मात्र आपल्याकडे दिसत नाही.

निर्वाचित राजकारण्यांच्या अ-दूरदृष्टीला लोकशाहीत पर्याय दिसत नाही. हा एक दुर्दैवी समान धागा आहे.

यात रांगेत १०७ नंबरचे टोकन दाखवणाऱ्या वृद्धेचा प्रश्न दुर्लक्षिला जातो - 'या कवड्या-रेवड्या मिळेपर्यंत मी जिवंत असणार का?'

*Email - artnondeco@yahoo.co.uk*
*Website - www.art-non-deco.com*

*(या लेखातील व्यंगचित्रे इंटरनेटवरून साभार!)*